जा.क्र.कोजिप/साप्रवि/कावि-१२/क्रीडा स्पर्धा/२०१८
सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद,कोल्हापूर
दिनांक :-२५/०१/२०१८
दूरध्वनी क्र.(०२३१)२६५५४८६
ई-मेल-dyceogenkop@gmail.com

प्रति,
मा.संपादक दैनिक ------------------------------

विषय :- क्रीडास्पर्धा सन २०१८ बाबत.

कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या वतीने, जिल्हा परिषद अधिकारी /कर्मचारी यांचेसाठी क्रीडा स्पर्धांचे आयोजन दिनांक २९/०१/२०१८ ते ३१/०१/२०१८ रोजी पोलीस क्रीडांगण ,कोल्हापूर येथे आयोजित करणेत आलेले असून सदर क्रीडास्पर्धेची प्रेसनोट सोबत जोडली आहे ती आपले दैनिक वृत्तपत्रामधून प्रसिध्द करणेत यावी ही विनंती.

सोबत :- प्रेस नोट जोडली आहे.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद,कोल्हापूर.

## सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद,कोल्हापूर
## क्रिडा स्पर्धा- २०१८
## संक्षिप्त टिपणी

---

कोल्हापूर जिल्हा परिषद अधिनस्त सर्व कार्यालयाकडील अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या क्रिडास्पर्धेचे उद्घाटन सोमवार दिनांक २९ जानेवारी, २०१८ रोजी पोलीस परेड ग्राऊंड, कसबा बावडा, कोल्हापूर येथे मा.ना.श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील सो,मंत्री,महसूल,मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) महाराष्ट्र राज्य,तथा पालकमंत्री, कोल्हापूर यांचे शुभहस्ते व मा.अध्यक्ष,जि.प.कोल्हापूर यांचे अध्यक्षतेखाली सकाळी ठिक - ९.०० वा.होणार असून सदरच्या स्पर्धा दिनांक २९ ते ३१ जानेवारी,२०१८ या कालावधीत पार पडणार आहेत.

या क्रिडास्पर्धेमध्ये क्रिकेट,हॉलीबॉल,कब्बडी,खो- खो , धावणे,रिले,बॅडमिंटन , टेबलटेनिस,थाळी फेक,गोळाफेक इ.सांघिक व वैयक्तिक खेळांचा समावेश आहे.

कोल्हापूर जिल्हा परिषद ही एकमेव जिल्हा परिषद आहे,की दरवर्षी अशाप्रकारच्या क्रिडास्पर्धेचे आयोजन करते. चालुवर्षी क्रिडा स्पर्धेचे चौथे वर्ष आहे.सदर ०९ प्रकारच्या क्रिडा स्पर्धेमध्ये एकूण ९४१ पुरुष व महिला कर्मचारी यांनी सहभाग घेतलेला आहे.

जिल्हा परिषदेतील कर्मचारी यांचे शारीरिक क्षमतेमध्ये वाढ व्हावी,दैनंदिन कामकाजातील तोचतोचपणा व सांचेबंदपणा कमी करून जीवनातील व जगण्यातील आनंद मिळवीता यावा,अधिकारी व कर्मचारी यांचे नाते संबंध दृढ व्हावेत व कर्मचाऱ्यांच्या सुप्तगुणांना वाव मिळावा , नेतृत्व गुणांची वाढ व्हावी, सांघिक भावनेचा विकास व्हावा या उद्देशाने जिल्हा क्रिडास्पर्धांचे आयोजन करणेत आलेले आहे.

गेल्या तीन वर्षी घेणेत आलेल्या क्रिडा स्पर्धेला मिळालेल्या उत्स्फुर्त प्रतिसादामुळे मागील वर्षी प्रमाणेच मुख्यालयापुर्तीच ही स्पर्धा मर्यादित न ठेवता पंचायत समिती स्तरावरील कर्मचाऱ्यांचाही सहभाग घेण्यात आलेला आहे.

क्रिडा प्रकार व सहभाग घेतलेले कर्मचारी व संघ संख्या

| अ.क्र. | खेळाचा प्रकार | कर्मचारी संख्या | एकूण संघ |
|---|---|---|---|
| १ | क्रिकेट | ४२० | २८ |
| २ | व्हॉलीबॉल | २७९ | ३१ |
| ३ | खो-खो | ३०६ | २७ |
| ४ | कब्बडी | ३१० | २९ |
| ५ | धावण / रिले | ३७० | - |
| ६ | टेबल टेनीस | ५६ | - |
| ७ | बॅडमिंटन | १५६ | - |
| ८ | थाळी फेक | १३४ | - |
| ९ | गोळा फेक | १८२ | - |

क्रिडा स्पर्धेबरोबरच काही अधिकारी व कर्मचारी यांचे अंगी असलेल्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी विविध गुण दर्शन अर्थात ! माझी कला ! या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनही चालु वर्षाच्या स्पर्धेचे वैशिष्ठ ठरले आहे.जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन या कार्यक्रमाची निर्मीती केली आहे.यामध्ये अनेक जि.प. कलाकारांनी आपल्या कला सादर केलेल्या आहेत.

या स्पर्धेमध्ये मोठया प्रमाणात महिला कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला आहे. सदरची स्पर्धा पार पाडणेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.कुणाल खेमनार, यांचे मार्गदर्शनाखाली सामान्य प्रशासन विभागाचे प्रमुख श्री.राजेंद्र भालेराव, यांचे नियंत्रणाखाली विविध समित्या तयार करणेत आलेल्या असून मा.अध्यक्ष,मा. उपाध्यक्ष जिल्हा परिषद कोल्हापूर तसेच सर्व विषय समिती सभापती आणि जिल्हा परिषद सदस्य त्याच बरोबर सर्व विभागातील विभाग प्रमुख व त्यांचे अधिनस्त सर्व कर्मचारी यांनी या स्पेर्धेच्या नियोजनामध्ये मोलाचा सहभाग नोदविला आहे.

मागील तीन वर्षाप्रमाणे या वर्षीच्या या स्पर्धाही यशस्वी होणेसाठी करावयाचे सर्व नियोजन करणेत आले असून कोणतीही त्रुटी राहणार नाही याची दक्षता घेणेत आलेली आहे.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद,कोल्हापूर